तरुण भारत सोमवार, २९ ऑगस्ट २०२२

# दोडामार्ग कॉलेजमध्ये उन्नत महाराष्ट्र अभियान कार्यशाळा



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयातील कार्यक्रमात मान्यवरांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. सुभाष सावंत.

वार्ताहर
दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'उन्नत महाराष्ट्र अभियान, आपले प्रश्न आपले विज्ञान' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील रिसर्च आणि आविष्कार विभागाच्यावतीने करण्यात आले होते. मुंबई येथील ग्रामीण क्षेत्र हेतू औद्योगिक विकास केंद्र, भारतीय प्रयोगीय संस्था मुंबईचे पार्थ बाबर आणि हर्षद तुळफुले यांनी महाविद्यालयातील उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. परिसरातील प्रश्न, छोटे-मोठे व्यापारी, उद्योगधंदे याविषयीच्या समस्यांवर भाष्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प कसा तयार करावा, याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. आर. एस. इंगळे यांनी केले. तर आभार डॉ. पी. डी. गाथाडे यांनी मानले.